**पुस्तक ओळख**

# नदीष्ट : लिव्हिंग ऑरगॅनिझम

## यामिनी दळवी

मनाच्या पृष्ठभागावर उमटणारे तरंग आणि आपल्याही नकळत आपल्यामध्ये तिचं वाहणं पेरत जाणारी नदी. ह्या नदीचे हुंकार वेगळे. तिचं ओलेपण वेगळं. तिच्या दिशा वेगळ्या. तिच्या वाळूच्या प्रत्येक कणातली धडधडही वेगळी. तिच्या काठावर असणाऱ्या-नसणाऱ्यांसोबतच तिची बांधिलकी, वेलीनं झाडाला घातलेल्या विळख्यासारखी आणि तिचा गर्भही सगळ्यांना जागा देऊ शकेल इतका गहिरा. नदीष्टमध्ये असणारी नदी ही याहून वेगळी कशी असू शकेल? कारण नदीष्ट म्हणजे नदीसोबत खळाळत राहाणाऱ्या जिवंत माणसांचा एक डोह. ज्या डोहामध्ये उतरल्यावर आपल्याला भेटणार आहे पुन्हा नदीच...! माणसात दडलेल्या अशाच डोहाचा तळ गाठायचा प्रयत्न म्हणजे 'नदीष्ट'. लेखक आहेत मनोज बोरगावकर.

एखाद्या नदीच्या काठावर आवडत्या मित्राच्या खांद्यावर डोकं ठेवून तासन्तास बसून राहावं आणि त्यानं त्याच्या आयुष्यातल्या घटनांची पोतडी आपल्यासमोर रिती करावी. त्यानं बोलत राहावं, आपण ऐकत बसावं. वाटलं तर त्याचा चेहरा आपल्या ओंजळीत घ्यावा. कधी त्याच्या पाठीवरून हात फिरवावा. कधी त्याच्या हातावर टाळी द्यावी. कधी दोघांनीही घट्ट घट्ट मिठी मारून निघून गेलेल्या क्षणांवर टिपं गाळावीत, तशी ही कादंबरी. केवळ कादंबरी नव्हे तर नदी रसरसून जगलेल्या, जगू पाहाणाऱ्या एका ओल्याजर्द माणसाचं आत्मचरित्रच! ज्याच्या धमण्यांमधूनही नदीच वाहत असल्याचा भास होईल, ज्याच्या मनाच्या डोहाचा थांग लागेपर्यंत आपल्याला काठावरून उठावसंही वाटणार नाही आणि ज्याच्या सोबत आपणंही होऊन जाऊ 'नदीष्ट'..!

'नदी म्हणजे आईचा विस्तारत गेलेला गर्भ आणि नदी म्हणजे लिव्हिंग ऑरगॅनिझम' केवळ ह्या दोन ओळींमध्येच संपूर्ण कादंबरी विसावलीय. आता उरतात ती केवळ पात्रं आणि त्या पात्रांसोबतच वाचक म्हणून उरलेले आपण. शहरीकरणाच्या सिमेंटच्या जगात जगत असतानाही कुठल्यातरी तीरावरून वाहत येणारी नदी आपल्याला तिचं बोट धरून पुढे चालत नेते. तिच्या अंतर्बाह्य समजूतदारपणाचे दाखले देत राहाते. कधी महापुराच्या वेढ्यात लोटूनही तिच्या तळहातांवर झेलत सहीसलामत वर आणते आणि कधी तिच्या आटत जाणाऱ्या पान्ह्यातही आपल्यासाठी ओंजळभर शिल्लक ठेवतेच.

नदीच्या आयुष्यातली असंख्य पात्रं आणि वेगवेगळ्या पात्रांमधून वाहणारी नदी यांना नदीष्टमधून गाठता येतं.

दररोज नेमानं नदीच्या कुशीत विसावणाऱ्या लेखकाची ही कादंबरी.

लेखिका मुंबईस्थित न्यूज १८ लोकमतमध्ये निर्माती पदावर कार्यरत आहेत.
इमेल- yaminidalvi8@gmail.com

अत्यंत सूक्ष्म निरीक्षणं, सभोवतालच्या स्थितीचं यथोचित शाब्दिक चित्रवर्णन, आणि लौकिकातील गोष्टींचा उहापोह करत असताना वाचकाला सतत चाचपडून पाहण्याची 'संधी' देणारी ही कादंबरी...

''गाडीत चढताना आपली नजरानजर झाली ना? फिर नजर किसने चुराई? तूने या मैने? नजर चुरानेवाला तू... और हिजडे हम?''

तृतीयपंथी असणाऱ्या सगुणाच्या तोंडून आलेलं हे वाक्य खरं तर वाचकालाही आपलं लिंग तपासून घ्यावं लागेल इतकं ठसठशीतपणे लेखकानं मांडलं आहे. लेखक म्हणतो तसं– ''सगुणाच्या आयुष्यासारखे सर्कमस्टान्सेस जर आपल्याला मिळाले असते तर आज आपणही सगुणाच्याच रांगेत उभे राहिलो असतो. समाजाचा केवढा मोठा भाग केवळ योगायोग म्हणून तृतीयपंथी होता–होता वाचत असतो.'' सगुणा म्हणजे कादंबरीच्या पटावर असणाऱ्या पात्रांमधला वजीरच.

त्यामुळे जसजशी कादंबरीची पानं उलटत जातात, तशी लेखकाच्या मनातील ह्या समाजाविषयीची भावना टप्प्याटप्प्यानं अधिक प्रगल्भ झालेली जाणवते. त्यामुळे एका टाळी वाजवणाऱ्या जमातीविषयी लेखकाच्या आणि पर्यायानं वाचकांच्या मनातही इज्जत निर्माण होते.

सोयीप्रमाणे जशा माणसानं जातीधर्माच्या भिंती बांधल्या, तशाच सोयीसाठी एका माणसाला दुसऱ्यापासून तोडण्यासाठी काही मापदंडही ठरवून घेतले. हे निर्माण करणाऱ्या माणसांच्या कळपालाच 'समाज' असं गोंडस नावही आहे. मात्र याच समाजात जन्माला आलेल्या माणसाला हीन वागणूक दिली जात असतानाही आपण राजरोस पाहातो. मात्र स्वत:ला स्ट्रेच करण्याची तयारी नसल्यानं समाजसेवक हा घटक सोडला तर कुणीही त्याविषयी फारसा पुढाकार घेताना दिसत नाही अशावेळी समाजाच्या नेमक्या कुठल्या मुळांना धरून आतापर्यंत जगू पाहातोय हा प्रश्नही लेखकाच्या बॅक ऑफ द माईंड घोंगावत राहातो.

'फिर मिलेंगे' या शब्दातून सगुणानं दिलेलं आणि न दिलेलं भेटीचं आश्वासन असो की लेखकाच्या पांढरपेशीपणाला नख लागू नये म्हणून दाखवलेला समजूतदारपणा असो ह्या सगळ्यातून सगुणाचं तृतीयपंथी असणं कसनुसं करून जातं. लेखकासोबतच वाचकालाही त्या व्यक्तिरेखेबद्दल सहानुभूती निर्माण होते. त्यातूनच लेखक आपल्या 'औकाती'बद्दल विचार करू लागतो. गिरीया म्हणून ठेवून घेतलेल्या पुरुषाशी शय्यासोबत करताना गर्भाशय नसणारा एक तृतीयपंथी जेव्हा गर्भ राहू नये यासाठी प्रिकॉशन्स म्हणून गोळ्या घेतो, त्यातून त्याची कीव येते. सोबतच त्याच्यात असणारं बाईपण जपण्याचा त्याचा आटापिटा वाचकाची दमछाकही करतो. 'कुवागमा'च्या निमित्तानं एका दिवसाचं सौभाग्य मिळवण्याची त्यांच्यातल्या प्रत्येकीची धडपड हीसुद्धा त्यांच्या ठायी असणाऱ्या स्त्रीपणाला उजागर करण्याचाच भाबडा प्रयत्न आहे. ज्याला श्रद्धेची जोड आहे आणि अंधश्रद्धेचीही. अशाच वेळी एखाद्याच्या आस्तिकतेबद्दल आणि नास्तिकतेबद्दलही लेखक लिहितो, ''एखाद्या आस्तिकाला दुसऱ्याचं नास्तिकपण प्राणपणानं जपता आलं पाहिजे आणि तसंच एखाद्या नास्तिकानंही दुसऱ्याचं आस्तिक असणं तितक्याच आदरानं स्वीकारायला हवं.''

ह्या कादंबरीतलं आणखी एक लक्षवेधी पात्र म्हणजे भिकाजी... जो वाचकांना खिळवून ठेवतो... भिकाऱ्यांच्या रांगेतही सर्वात शेवटी बसून भीक मागणाऱ्या आणि परिस्थितीनं आलेलं भिकारीपण शांतपणे घेऊन फिरणाऱ्या ह्या भिकाऱ्याच्या पात्रानंही कादंबरीत श्रीमंती आणलीय. 'रानमांजर' ह्या एका कारणापायी उद्ध्वस्त झालेल्या माणसाची कैफियत म्हणजे भिकाजी. मुलीचा पापा घेण्यासाठी पुढे झालेल्या मात्र आपल्या तोंडाला दारूचा वास येतोय म्हणून माघारी फिरणाऱ्या ह्या पात्राच्या हातून आपल्या मुलीचाच जीव घेण्याची घडलेली घटना वैफल्याची परिसीमा गाठते. त्यासाठीची शिक्षा भोगून झाल्यावरही ते पाप धुण्यासाठी रोज नदीवर येणाऱ्या आणि कातडी

खसाखसा घासणाऱ्या भिकाजीला पाहून दुःख डोक्याला बांधून मिरवणारा एक बैरागी दिसतो.

कादंबरीतल्या प्रत्येक पात्राला समजूतदारपणाची किनार आहे. कदाचित तोच लेखकाच्या जगण्याचा भागही असू शकेल. कारण लेखकाला त्या प्रत्येक पात्रामध्ये त्यांचं असणारं वेगळेपण ठळकपणे दिसत असतानाही त्या पात्राच्या जगण्याचं समजूतदारपण सुद्धा दिसलंय. पात्रांच्या ठायी असणारा हा समजूतदारपणा सुद्धा नदीकडूनच आलेला असावा. कारण नदी हाच ह्या सगळ्यांना जोडणारा एकमेवद्वितीय दुवा आहे. माणसाच्या उगमापासून त्याच्या अस्तापर्यंत वाहत राहाणाऱ्या ह्या नदीच्या सान्निध्यात आलेल्या पात्रांमध्ये 'मानवता' हाच एकमेव धर्म आहे.

कादंबरीतील नमूद करावी अशी लेखकाची हातोटी म्हणजे कोणत्याही सर्वसामान्य नदीच्या काठावर होणाऱ्या दिनचर्या सोडून लेखकानं कादंबरीमध्ये सामान्य असणाऱ्या मात्र सामान्य जीवन जगू न शकणाऱ्या अशा व्यक्तिरेखा मांडल्यात. सगुणा, भिकाजी, दादाराव ह्या पात्रांमध्ये जगण्याची असोशी आहे आणि कुणापासून तरी तुटल्याची ठसठसही आहे.

या व्यक्तिरेखांना त्यांच्या जगण्याचं अवकाश आहे. त्यांना त्यांच्या जगण्याची चौकट आहे. त्यांनाही सामान्य म्हणून जगायची इच्छा आहे. चाकोरीबाहेरचे घटक म्हणून ज्यांना आजवर गावकुसाबाहेर ठेवलं गेलं, त्यांच्याशीच लेखक नातं निर्माण करू पाहातोय. मात्र हे नातं निर्माण करताना लेखकाला स्वतःच्या पांढरपेशी समाजाचा विसरही पडत नाही. कित्येक वर्ष एक शब्दही न बोललेला भिकाजी जेव्हा लेखकाशी भडाभडा बोलून आपल्या दुःखाची नस त्याच्या हातात देतो, त्यानंतर निरोपाच्या वेळी लेखक आपल्या खिशात हात घालून त्याला पैसे देण्याचा असफल प्रयत्न करतो. त्यावर ''आज पैसे नकोत, कोणात गुंतून पडणं माझ्या जगण्याच्या पद्धतीत बसत नाही'' असं म्हणून भिकाजी निघून जातो. त्यावेळी भिकाजीच्या जगण्याच्या मोठेपणाचं कौतुक करावं की खिशात हात घालणाऱ्या पांढरपेशा संस्कृतीचं कोतेपण गिरवावं हे संभ्रम निर्माण करणारं आहे. पात्रांची भाषाशैली, त्यांच्या गुणवैशिष्ट्यांचं वर्णन आणि लेखकानं केलेली प्रासंगिक विधानं या साऱ्याचा मेळ नैसर्गिकरीत्या झाल्यानं कादंबरी म्हणजे लेखकाची रोजनिशीच वाटते. तर कादंबरीमध्ये कृत्रिमतेला बगल दिल्यानं कादंबरीचा पोत हा नदीच्या निळाईसारखा ताजातवाना राहिला आहे.

कुणाच्यातरी सांगण्यावरून अन्जान जागेची वाळू काढणाऱ्यासाठी जीव धोक्यात घालून सरसावलेला लेखक आपल्याला त्याच्यातल्या सर्वसामान्य माणसांच्या गुणांची जाणीव करून देतो. कादंबरीतील काही प्रसंगांमध्ये लेखकाची दिसणारी कचखाऊ वृत्ती ही वाचकाला त्याच्याच वृत्तीशी साधर्म्य सांगणारीही वाटून जाते. काही प्रसंगांमध्ये चकचकीत जगाचं व्यवहारज्ञान लेखक आपल्या कृतीतून दाखवतो. यातून समाजातल्या त्याच हिश्शाचा भाग असणारा वाचकही स्वतःला पडताळून पाहायला लागतो.

साऱ्या टापूचा सम्राट असल्यासारखा मात्र कुणालाही न दुखावणारा कालूभैय्या, त्याची शहाणी जनावरं, मासे पकडणारा बामणबाड, स्वत: भीक मागून खाणारी मात्र लेखकाला त्याच्या गळ्यातल्या सोन्याच्या चेनची काळजी घ्यायला सांगणारी सकिनाबी, पोहून आल्यावर गरमागरम चहा दररोज करून देणारा पुजारी, ज्यांनी आयुष्यभर ह्या नदीत मुशाफिरी केली, लेखकाला आपला वारसा दिला ते दादाराव आणि कादंबरीच्या अवघ्या अवकाशाला व्यापून राहिलेली दस्तुरखुद्द नदी.

ही सगळी पात्रं पाण्यासारखीच निर्मळपणे रेखाटण्यात लेखक यशस्वी ठरलाय. शहरीकरणाच्या प्रदूषणात घुसमटणारी आणि जगण्याच्या युद्धात हरलेली पात्रं नदीच्या काठावर येऊन आपलं दुःख मांडताना दिसतात. काहीही न बोलणारी मात्र सगळं काही ऐकून घेणारी नदी अशावेळी त्यांना त्यांची सोबतीण वाटते. निसर्गाच्या जवळ जाण्याचा मार्ग म्हणून ह्या पात्रांनी नदीची निवड

केलीय. मायेची ऊब मिळवण्यासाठी प्रत्येकजण तिच्या काठावर येताना दिसत राहातो. मनातल्या दु:खांची तिच्या काठावर बसून उजळणी करतो. आसवं गाळून तिच्या नितळ पाण्यात खारेपणाचा अंशही सोडतो आणि पुन्हा निर्मळ होतो. आपल्या बाहूंनी नदी देत असलेलं हे शहाणपण लेखकानं शब्दाशब्दांतून व्यक्त केलंय. मूकपणे वाहाणाऱ्या नदीलाही असणारी भाषा, नदीचे मूडस् आणि नदीमध्ये असणारा जिवंतपणाचा अंश ह्या साऱ्या गोष्टी कवितेसारख्या झरझर ह्या कादंबरीच्या पानापानातून वाहात आल्यात.

शहरीकरणाच्या विळख्यामुळे नदीच्या गर्भाशयाला होणारी इजा आणि अबॉर्शन्समुळे बाईच्या गर्भाला होणारी इजा ह्यात फरक कुठेय?

आपल्याला बाईच्या गर्भापर्यंत जाता आलं पण तिच्या मनाचा पत्ता आपल्याला किती ठाऊक? विनाशाच्या महापुरातही सारं शिवार गाळानं भरून टाकणारी नदी आपल्या किती लक्षात राहाते? शतकानुशतकं ज्या नदीनं तिचं आयुष्य उधळून ह्या सृष्टीला भरभरून दिलं तिला जागोजागी बांध घालताना आपण कितीसा विचार केलाय? राजरोसपणे तिच्या गर्भापर्यंत जाऊन तिच्या वाळूचा खोऱ्यानं उपसा करणारे आपण...

आपल्याला नदीच्या धर्मापेक्षा माणूसपणाचा धर्म तरी किती कळलाय?

याची चाचपणी लेखक करताना दिसतो. नदी असो की बाई... मनाच्या पटलावर असणारी ह्या दोघींची रूपं खरी की त्यांच्या न दिसणाऱ्या अस्तित्त्वातच त्यांचं आदिम सत्य आहे? जे माणूस म्हणून आपल्या अजूनही हाती लागत नाही. हे आणि असे असंख्य प्रश्न विचारतच कादंबरी पुढे सरकते. कधी लेखकाची इंग्रजी भाषा त्याच्या मराठीशी एकरूप होत, तर कधी सकिनाबीची 'माटीमेले' शिवी हासडत तिथल्या ग्रामीण भाषेचाही लहेजा कादंबरीतून पाहायला मिळतो. सगुणाच्या अर्ध्यामुर्ध्या हिंदी आणि मराठी भाषेची झालेली सरमिसळही वाचताना वेगळेपण निर्माण करते. तर अस्खलितपणे शुद्ध मराठीत बोलणारा भिकाजी, त्याच्या विचारांची रेंज आणि त्याची शाब्दिक पकड ह्या भाषिक सौंदर्यस्थळांचा लेखकानं खुबीनं वापर केला आहे.

पात्रांच्या तोंडी असणारी आणि एकूणच कादंबरीची भाषा नदीच्याच आवाजाशी विरघळून जातेय असं म्हणावं लागेल.

''आपल्याला रोजची सवय आहे नदीवर यायची... त्यामुळे 'शेवटी' इथे आणल्यावर आपल्याला वेगळं काही वाटणार नाही'' असं लेखक म्हणतो. नदीच्या दोन घाटांमध्ये असणारं जीवन आणि मृत्यू हे अंतर पाहिल्यावर मृत्यूच्या दिसणाऱ्या सावल्या अधिकाधिक गडद झाल्याचा भास होत राहातो आणि अशावेळी पुन्हा सगुणा आठवते.

''ही नदी माझ्या गावावरून वाहात येते... तिथे किनाऱ्यावर माझ्या माय आणि बहिणीला स्पर्शत असेल, ह्या पाण्याच्या रूपानं का होईना आम्ही पुन्हा जोडले जात असू...'' सगुणाच्या ह्या वाक्यानं लेखक पुन्हा एकदा मरणाच्या काठावरून उठून नदीच्या व्याकूळ पात्रामध्ये स्वत:ला झोकून देतो. ही कादंबरी केवळ लेखकाच्या नाही तर प्रत्येक वाचकाच्या ओंजळीत दातृत्वाचा अंश देणारी आहे. आणि पाण्यामधूनच जगण्याच्या डोहात उडी मारण्याचं सामर्थ्यही ह्या कादंबरीतून नकळतपणे रुजत जाणारं आहे.

त्यामुळे ज्याला नदी कळली, त्याला बाईच्या काळजातल्या महापुराचीही खोली कळू शकेल. ज्याला काहीच कळणार नाही, त्याच्यासाठीही नदी आजन्म वाहात राहील तिचं समजूतदारपण घेऊन. निरंतर...!

●

***नदीष्ट,*** मनोज बोरगावकर, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, किंमत २००/-